# धर्मसुधारणा व महाराष्ट्रीय स्त्री जीवन

**श्री. अंबादास ओं. बाकरे**
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास)
न.मा.द. महाविद्यालय, गोंदिया

**सारांश**
*१९ व्या शतकातील धर्मसुधारणा चळवळीने हिंदू समाज जीवनाच्या आचार संकल्पनामध्ये लपलेल्या ब्राम्हणी लबाडीला चव्हाटयावर आणले. पाश्चात्य समाजाचे आधुनिक स्वरूप लक्षात घेत महाराष्ट्रीय समाज सुधारकांनी हिंदू समाजाअंतर्गत आवश्यक असणा—या स्थित्यंतराच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी ऐतिहासिक अन्वयार्थ पध्दतीचा अवलंब करित युरोपीय समाजात घडून आलेल्या क्रांतीचा, वैज्ञानिक व बौध्दिक प्रगतीचा आढावा घेऊन तेथील समाजाच्या प्रगतीची लक्षणे अधोरेखित केली. विशेषत: लोकहितवादी महात्मा फुले, गो. ग. आगरकर न्या. रानडे, रा. ग. भांडारकर आदिनी हिंदू धर्मातिर्गत प्रक्रीयांचा व प्राचिन स्त्रियांच्या आदर्शाचा आढावा घेत स्त्रियांना सन्मानाचे स्थान प्राप्त होण्याची गरज प्रदर्शित केली असे असले तरी २१ व्या शतकाच्या उंबरठयावर उभे असतांना महाराष्ट्रीय स्त्रीची उन्नती साधणारी साधने ख—या अर्थाने मुक्त स्वरूपाची राहिली नाही. हे प्रकर्षाने जाणवते. १९ व्या शतकात घडून आलेल्या सुधारणा चळवळीच्या विचारधारांचा प्रभाव हा उत्तरलक्षी का ठरू शकला नाही याची कारणे आजही प्रचलित असलेल्या समाज व्यवहारात लपल्याचे दिसते त्या पार्श्वभुमीवर धर्मसुधारणांचा महाराष्ट्रीय समाजावर पडलेल्या प्रभावाची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते.*

**शब्दसंक्षेप —** सुधारणा, चळवळ, स्त्रीउन्नती, सामाजिक व्यवस्था, जात निर्मुलन, आंतरजातीय विवाह, अर्थकारण,

**प्रस्तावना**

सुधारणेच्या या सर्व प्रवाहांनी सामाजिक उन्नतीसाठी स्त्री वर्गाच्या प्रगतीला सामाजिक क्षेत्रातील स्थानाला महत्व दिले. त्या अनुषंगाने वैचारिक व कृतिशील आंदोलन उभे केले. प्रसंगी त्याला कायदयाचे पाठबळ देण्यासाठी संघर्श केला त्यांच्या हया सर्व प्रयत्नांचा परिणाम पुढील काळात दिसुन येऊ लागला. स्त्री प्रश्नासंबंधाने स्त्रियांमध्ये आमुलाग्र जागृती घडून येऊ लागली. स्त्री उन्नतीसाठी पुरूषांवर विसंबून राहण्याऐवजी स्त्रिया स्वत: धडपडू लागल्या, सेवासदन, शारदासदन, बालिकाश्रम, यांसारख्या संस्थाची, स्त्री प्रश्नांची कड घेणा—या चळवळीची निर्मिती होऊ लागली हया सर्व संस्था आंदोलनांनी स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यास सुरूवात केली. आणि सर्वात महत्वाचे २० व्या शतकातील स्त्री उन्नतीची चळवळ जातिकक्षाबाहेर जाऊन विकसित झाली.

**कौटुंबिक व सामाजिक स्थिती**

२० शतकात विवाहासंबंधाने सामाजिक सुधारणा चळवळीचा प्रभाव महाराष्ट्रीय समाजावर जाणवू लागला होता. विवाहाचे वय सोळा ते अठरा होते ते नागरी भागात अठरा पासून तिशीपर्यंत गेले. मात्र विवाह जाती अंतर्गत होत असत. अजूनही "आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहासाठी समाज मन तयार झाले नव्हते".[१] स्त्री शिक्षणाचा स्त्रियांच्या विवाहावर विलक्षण प्रभाव पडल्याचे दिसून येते. स्वातंत्रोत्तर कालखंडात तर यासंबंधाने उत्तरोत्तर प्रगती झाली. शिवाय शहरी भागात मुलीच्या वर पसंतीला काही अंशी मान्यताही मिळत होती हे कमल पाध्ये, सुनीता देशपांडे यासारख्या स्त्रियांच्या विवाहातून दिसून येते. प्रौढ विवाहामुळे स्त्री पुरूषांच्या वैवाहिक नात्यातही बदल घडून आला. पतिव्रता धर्माच्या सेवाव्रती धारणेबाबतच्या मानसिकतेत तो दिसून येऊ लागला. "पति परमेश्वराऐवजी सहचर"[२] हया नविन नात्याची उभारणी होऊ लागली. कौटुंबिक व सार्वजनिक जीवनात असलेली पडदयामागील स्त्री खुल्या वातावरणात वावरू लागली. अर्थात हया जिवनाची सुरूवात उच्च वर्गात झाली होती. बहूजन समाज त्यामानाने अजूनही परंपरागत धारणांशी जोडलेला होता. महाराष्ट्रातील मराठा समाजात

स्त्री संबधाने असणा—या प्रतिमेचे वर्णन करतांना बाबा आढाव म्हणतात, “स्त्रीचे स्वातंत्र्य नाकारण्यात मराठयांमधील वांशिक अहंकाराची जोपासना आहे. आपल्या घराण्यातील स्त्रीला विधवा झाल्यानंतर पुनर्विवाहाचा हक्क नाकारला जातो यात कोणता पुरूषार्थ आहे? आणि मराठा जातीतील कुणबी व पाटील यांच्यामध्ये पुनर्विवाहाची चाल आहे परंतु आपण उच्च कुलीन आहोत हे दाखविण्यासाठी ही बाब झाकुन ठेवण्यात येते”.[३]

जात निर्मुलनाच्या चळवळीने स्त्री वर्गाच्या लैगिक शोषणाच्या बंधनात्मक पुरूषी वर्चस्वाला तडा दिला. आंतरजातीय विवाहाची संकल्पना समाजजीवनात उतरू लागली हे खरेतरं स्त्री शिक्षणाचा सर्वात प्रभावी परिणाम होता. शिक्षण आणि व्यवसायाच्या संकल्पनेमुळे स्त्रियांना आपला साथीदार निवडण्याची संधी मिळू लागली. जातिसंबंधाने असणा—या पारंपारिक धारणा यामुळे कमकुवत होण्याची चिन्हे दिसताहेत. हे जरी खरे असले तरी जात संरचनेची मुळे पुर्णत: उखडून न टाकता आल्यामुळे कालौघात पुन्हा जात श्रेष्ठतेला प्राधान्य मिळत असल्याचे दिसून येते.

**सार्वजनिक जीवन**

सार्वजनिक क्षेत्रात आता स्त्रिया रंगभुमीकडे वळू लागल्या होत्या. नाटकांमधे स्त्री पात्रासाठी स्त्रियांनी काम करावे या “रंगभूमी” मासिकाच्या आवाहनास स्त्री वर्गाकडून अनूकुल अशी भुमिका व्यक्त करणारे पत्र सौ. काशीबाई हेरलेकर यांनी लिहीले त्यात त्यांनी नाटकात जर स्त्रियांनी काम केले तर त्याचा निश्चित चांगला परिणाम होईल या आशयाचे मत केले, त्या म्हणतात, “स्त्रियांच्या भुमिका स्त्रियांनीच केल्या पाहिजे असे नाही पण केल्या तर स्वाभाविकपणे चांगल्या वढतील. दुसरे पुरूषांच्या अंगी स्त्री स्वभाव धर्म नसल्यामुळे स्वर, अभिनय, शरीर , मार्दव इ. संबंधाने व्यंग दिसतात. अर्थात असे काम करण्यासाठी स्वाभाविक गुण, सुशिक्षण , रहस्य समजण्याची ताकद रूप इ. गुण विशेष असणे आवश्यक आहे. असे असले तरी स्त्री या नात्याने सार्वजनिक क्षेत्रात वावरतांना सामाजिक परंपरांचा धोका ही होता. हा धोका अधोरेखित करतांना त्या म्हणतात, नितीदृष्टया अनिष्ट उपयोग होण्याचा संभव जास्त आहे. तसेच हया धंदयातील परिस्थिती अत्यंत नाजूक व चमत्कारिक असल्यामुळे कुलीनपणास धोका आहे”[४]. सार्वजनिक क्षेत्रातील स्त्रीच्या प्रवेशासंबंधाने (विशेषत मनोरंजनाच्या क्षेत्रात) काशीबाई हेरलेकर यांनी व्यक्त केलेल्या शंकेला, रमाबाई पटवर्धन अधिक व्यापक स्वरूपात विशद करतात. १९४० च्या दशकात स्त्री व पुरूष दोघांनी संमिश्र रूपाने रंगभूमीत काम करावे हा विचार उदयास येऊ लागला होता. त्यावर आपली प्रतिक्रीया व्यक्त करतांना रमाबाई म्हणतात, “............पण बहूजन समाजातील कुलीन स्त्रियांनी सरसहा रंगभूमीची सेवा व तीही संमिश्र करावी का? हा मोठा विचार करण्याचा प्रश्न आहे”. असे म्हणून यापाठीमागे त्यांच्या मनात असणारी भिती व्यक्त करतांना अशा क्षेत्रात कुलीन स्त्रिया उतरल्या तर त्याचा त्यांच्या व्यक्तीगत जीवनावर, कौटुंबिक व पर्यायाने समाज जीवनावर इष्टानिष्ट परिणाम होईल. यासाठी त्या कु. शांता आपटे या अभिनेत्रीचे “जाऊ मी सिनेमात” या आत्मचरित्रातील जीवनवास्तवाचा आधार देतात.[५] वस्तुत: रंगभूमीसारख्या क्षेत्रात स्त्रियांनी उतरण्यापाठीमागे नितीमत्तेबाबतच्या समाजधारणेवर असलेल्या निष्ठेशी या काळातील स्त्री सहमत असल्याचे दिसते.

**सामाजिक स्थान**

स्त्रीचे कौटुंबिक व सामाजिक स्थान निश्चित करतांना तिच्याकडे “मुलगी” म्हणून बघण्याच्या पारंपारिक दृष्टीकोनाने स्त्री जीवनाचे स्वरूप निश्चित केले गेले. “पतिव्रता आणि पावित्र्य” धारणामुळे स्त्रीला स्त्री कोषात बंदिस्त करण्यात आले. या आधारावर तिचे व्यक्तीस्वातंत्र्य नाकारण्यात आले.

शिवाय "आदर्शीकरणाच्या पोकळ धारणा" तिच्या भोवती गुंफण्यात आल्याने स्त्रीजवळ केवळ "स्त्रीत्व" ही एकच बाब पुरूषी सत्तेने राहू दिली. सेवा धर्माच्या पालनाची सक्ती व शिक्षण यामुळे स्त्री मधील स्वतंत्र विचारांची ज्ञानात्मक परिकल्पना काढून घेतली गेली. साहजिकच याचा स्त्री जीवनावर गंभीर परिणाम झाला. स्वअस्तित्व, स्वातंत्र्य, स्वविचार यापासून मराठी स्त्री स्वातंत्र्यानंतर ही कोसो दुर राहिली. हे घडण्यापाठीमागील भुमिकांचा शोध घेतांना "मराठा स्त्रियांच्या आत्मभावना" मिनल जगताप अधोरेखित करतात. "ज्यात बहूतेक स्त्रिया बालपणापासूनची जडणघडण आणि पिता, भाऊ आणि पती यांच्या दबावाला हया सर्व बाबींसाठी कारणीभूत मानतात".[६] याउलट शिक्षीत महिलांमध्ये मराठा जातीच्या परंपराविषयी मोठा तिटकारा असल्याचे ही त्या दाखवून देतात. शिक्षीत महिलांचा जातितंर्गत विवाहापेक्षा आंतरजातीय विवाहाला अधिक पाठिंबा आहे. याचे कारण विशद करतांना "मराठा जातीचा अभिमान तोडण्याची हया महिलांची भावना असल्याचे, त्या सांगतात शिवाय आपला सहजीवनकर्ता चांगल्या प्रवृत्तीचा असावा हे हया महिलांचे आंतरजातीय विवाहासंबंधाने मत आहे".[७] अर्थात शिक्षणाच्या प्रभावामुळे महिलामध्ये स्वहिताविषयीची तळमळ जागृत झाल्याचे यापेक्षा अधिक चांगले उदाहरण मिळू शकत नाही. मराठा समाजाने दडपलेल्या भावना शिक्षणामुळे उत्तेजित होतात त्याचे हे दयोतक आहे. ही बाब मिनल जगताप यांनी मराठा स्त्री संबंधाने पुढे आणली.

**कायदेशीर / घटनात्मक अधिकार (स्थान)**

भारतीय स्त्री प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी समाजसुधारकांनी आपल्या खांदयावर घेतली. त्यासाठी चळवळी उभ्या केल्या. समाज रोषाला बळी पडले त्यामुळे सुधारणांचा विचार समाज जीवनात रूजू लागला. हे जरी खरे असले तरी हया प्रश्नाला निश्चित अशी कायदयाची ही बाजू होती. वासाहतिक कालखंडात व स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्री प्रश्नांची सोडवूणक करणारे कायदे हे निश्चितच स्त्री प्रश्नासंबंधीचे परिणामकारक "घटनात्मक प्रतिमान" राहिले.

**वासाहतिक व स्वातंत्र्योत्तर कालखंडात करण्यात आलेल्या कायदयांचा स्त्री प्रश्नांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय अषा सर्वच घटकांशी संबंध राहिला. अर्थात वासाहतिक कालखंडातील बहूतेक कायदयांसाठी सरकारचे मन वळविण्यासाठी वृत्तपत्रीय माध्यमांचा चळवळींचा यथायोग्य वापर करण्यात आला. याचा स्त्री प्रश्नासंबंधाने कायदे करतांना वासाहतिक सत्तेवर प्रभाव पडला.**

वासाहतिक कालखंडात ब्रिटीश दंडसंहितेचा पहिला मसुदा व प्रारूप १८३७ मध्ये तयार झाले. हा भारतीय दंड संहितेचा (IPC) प्रारंभ मानला जातो. यात अनुक्रमे १८५३, १८६० मध्ये बदल करून सुधारित भारतीय दंड संहिता लागू करण्यात आली. हया घटनात्मक विकासाचा दुसरा कायदेशीर विकास मात्र १८२९ पासूनच सुरू झाला, जो स्त्री सुधारणेशी निगडीत होता. सामान्यपणे वासाहतिक कालखंडात पुढीलप्रमाणे कायदे करण्यात आले. १८२९ —सतीबंदी कायदा, १८५६ —विधवा पुनर्विवाह कायदा, १८७२ — विवाह नोंदणी कायदा, १८९१ — संमती वयाचा कायदा, १८२१ — स्त्री मतदान हक्क कायदा, १९२८ —वारसा हक्क कायदा, १९२९ — बालविवाह प्रतिबंधक कायदा, १९३७ — हिंदु स्त्रीचा मालमत्तेचा हक्काचा कायदा, १९४६—४७ व्दिभार्या प्रतिबंधक कायदा इत्यादी महत्वाचे कायदे स्त्री प्रश्नासंबंधाने वासाहतिक कालखंडात करण्यात आले. या कायदयांचा भारतीय स्त्री जीवनाच्या पारंपारिकतेवर निश्चितपणे प्रभाव पडला. भारतीय स्त्रीला पारंपारिक धर्मशास्त्रीय कचाटयातून ख—या अर्थाने मुक्त करण्याचे कार्य या कायदयांनी केले. सतीबंदी कायदा हा एकुण हिंदु पुराणमतवादयांना मिळालेला मोठाच मानसिक व धार्मिक धक्का होता, आणि स्त्री दास्य विमोचनाची ती पहाट होती.[८] या ही पुढे जाऊन असे म्हणता येते की, "हिंदू स्त्रीला खुल्या वातावरणात मोकळा श्वास घेऊ देण्याची ही पहिली प्रक्रीया होती. या प्रक्रीयेला हळूहळू अनेक आधार मिळत गेले. स्त्री दास्याची चौकट मोडण्याची परंपरेला नाकारून स्त्री व्यक्तीत्वाची हिंदू समाजात उभारणी करण्याची ही

३

घटनात्मक वाटचाल होती, जी सनातनांच्या प्रखर विरोधाच्या पार्श्वभुमीवर सुधारकांनी घेतलेल्या भुमिकांचा सकारात्मक परिणाम होती". वासाहतिक सत्तेच्या दंडसंहितेला १८६४ नंतर पुर्णतः धर्मनिरपेक्ष स्वरूप प्राप्त झाले. सती प्रथेइतकाच विधवांचा प्रश्न सामाजिक जीवनात चिंता करणारा ठरला होता. त्याविरोधात बंगालमध्ये ईश्वरचंद विदयासागर यांनी तर महाराष्ट्रात विष्णुशास्त्री पंडीत, डॉ. रा.गो भांडारकर, म. फुले यांनी रान उठविले त्याची परिणती १८५६ च्या विधवा पुनर्विवाह कायदयात झाली. यामुळे विधवांच्या जीवनाला एक नवी दृष्टी मिळाली असली तरी सनातनी समाज धारणेमुळे या कायदयाला हवे तसे यश मिळू शकले नाही. या पार्श्वभुमीवर मलबारी यांच्या संमती वय विधेयकाला निश्चित महत्व आहे. मलबारीनी बालविवाह आणि विधवा जीवन यातील आंतरसंबंध पुढे आणून संमती वयाचा जोरदार पुरस्कार केला. त्यांच्या प्रयत्नांना १८९१ मध्ये यश आले. परंतु विधवा पुनर्विवाहाची समस्या आजही प्रकर्षाने जाणवते. त्यापाठीमागील आकृतीबंध स्पष्ट करतांना मंगला सांमत म्हणतात, "विधुरांना कुमारिका उपलब्ध होतात यामागे अजूनही मुलीचे आर्थिक परावलंबित्व, मुलीचा विवाह झालाच पाहिजे ही मूळ कल्पना तर आहेच परंतू त्याचबरोबर विधवा स्त्री ही दुस—या पुरूषाने वापरलेली हा मनोग्रहही विधवा विवाहाची मुख्य अडचण आहे".[९] त्यामुळे साहजिकच संमती वयाच्या कायदयाने स्त्री शोषणाला काही अंशी तरी अंकित केले. हे महत्वाचे आहे.

**"१८९० ते १९२० च्या दशकातील कालखंड स्त्री प्रश्नासंबंधाने काहीशी स्थितीशील वाटचाल करणारा ठरला त्यापाठीमागे राजकीय सुधारणांच्या मागणीने घेतलेला जोर हयाबरोबरच सुधारणेच्या क्षेत्रातील प्रभूंतीचे वयोमानाने होणारे निधन कारणीभूत होते"**

१९२० च्या दशकातील दोन कायदे स्त्री प्रश्नांची उकल करण्यासंबंधाने महत्वाचे ठरले. पहिला १९१८ चा पटेल ॲक्ट जो शिक्षणाशी निगडीत होता व दुसरा सारडा कायदा (याला शारदा कायदा म्हणूनही संबोधले जाते) या दोन कायदयांनी स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवेशाला कायदेशीर रूप प्राप्त करून दिले. तर १९२८ व १९३७ च्या कायदयांनी स्त्रीच्या आर्थिक अधिकारांना घटनात्मक रूप दिले. एकंदरित गांधीयुगात स्त्रीच्या सार्वजनिक जीवनातील वाढत असलेल्या प्रवेशाने हिंदू स्त्री बाबतच्या प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत असल्याचे या कायदयांनी दाखविले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्री प्रश्नांची गांभीर्याने दखल घेण्यात आली. अर्थात त्यापाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची व भुमिकांची पार्श्वभुमी होती. हिंदू कोड बिलाने संपूर्ण हिंदू समाजजीवन ढवळून निघाले. स्त्रीच्या पारंपारिक जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. १९५५ चा हिंदू विवाह कायदा, १९५६ चा हिंदू वारसा कायदा, १९६१ चा हुंडाबंदी कायदा, हे तीन महत्वपुर्ण कायदे भारतीय राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले. या कायदयामुळे घटनात्मक दृष्टया स्त्रीला समानतेचा अधिकार प्रदान करण्यात आला. कोणत्याही पातळीवर ती अत्याचाराची बळी पडू नये याची तजवीज करण्यात आली.

**स्त्रीशिक्षण**

स्त्री शिक्षणाची हवी तशी जागृती न झाल्यामुळे २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत शिक्षणाबाबतीत स्त्री वर्ग (विशेषतः बहूजन स्त्री) उदासिन राहीला. अर्थात यापाठीमागे पितृसत्ताक समाज, जात व्यवस्था, स्त्री संदर्भाने असणारी *लैंगिक पावित्र्याची तथाकथित धारणा, ग्रामीण व नागरी जिवनशैलीतील अंतर, ज्ञानात्मक क्षेत्राबाबतचा संकुचित दृष्टीकोन शिक्षण हे केवळ उच्च वर्गाचे त्यातही पुरूषांचे क्षेत्र आहे* असल्याकारणाने सुधारणा चळवळीच्या प्रयत्नानंतरही स्त्री शिक्षणाचा विकास मंद गतीने होत राहिला. त्यामुळे कायदयाचे काही अंशी पाठबळ असूनही २० व्या शतकातील स्त्री कौटुंबिक पातळीवर बंदिस्तच राहिली. हया बंदिस्तीकरणावर आघात करण्याचे कार्य २० व्या शतकात रमाबाई रानडे, महर्षी कर्वे, जानकीबाई आपटे, डॉ. रखमाबाई यासारख्या स्त्री सुधारकांनी केले.

४

**सेवासदन स्त्री शिक्षणासंबंधाने कार्य करणारी पहिली महाराष्ट्रीय संस्था होती**. जिच्या मंचावरून महिलांनी स्त्री शिक्षणाचा हिरीरीने पुरस्कार प्रचार केला.

स्त्रीशिक्षणासंदर्भात सुधारणा चळवळीच्या कार्याचा परिणाम २० व्या शतकात जाणवू लागला. १९०० च्या आसपास स्त्री शिक्षणासंबंधाने महाराष्ट्रात वैदयकीय, शिक्षकी पेशा, व्यावसायिक शिक्षण देणा—या शाळा महाविद्यालये मोठया प्रमाणात उघडू लागली. १९०२ मध्ये हया संस्थामधून शिक्षण घेणा—या स्त्रियांमध्ये कला महाविद्यालयात शिकणा—या ३०, औदयागिक शिक्षण घेणा—या ७५, वैदयकीय शिक्षण घेणा—या ०५ चित्रकलेचे शिक्षण घेणा—या १०, शिक्षकीय महाविदयालयात शिकणा—या २३४ मुली होत्या. १९३५ पर्यंत महाविदयालयीन शिक्षण घेणा—या मुलींची संख्या ७५ वरून १२४५ पर्यंत गेली.[१०] स्त्री शिक्षणाचा हा विकास निश्चितच "परंपरा आणि आधुनिकतावादी" मुल्यांमधील संघर्षातून झाला होता. तरीही स्त्रियांनी या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली.

**सेवासदन**

याअगोदरच सेवासदनने स्त्री शिक्षणाच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वळवले होते. "गोपाळकृष्ण देवधर सेवासदनात सहभागी झाल्यानंतर त्यांनी अनाथ मुलींना शिकविण्याचे कार्य सुरू केले. पुण्याचे सेवासदन रितसर शाळा बनली".[११] हळूहळू सेवासदनाची स्त्री शिक्षणाची दृष्टी अधिक व्यापक बनू लागली. रमाबाईनी महिलांनी वैदयकीय क्षेत्रात उतरण्यासाठीची मोहीम सुरू केली. त्याचे फळ म्हणजे महिलांचा वैदयकिय शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलू लागला. सेवासदनच्या प्रयत्नाने व वसतिगृहामुळे स्त्रिया या क्षेत्रात उतरू लागल्या.[१२] अशाप्रकारे १९२४ पर्यंत स्त्री शिक्षणासंबंधाने रमाबाई अहोरात्र झटू लागल्या. त्याची महात्मा गांधीनीही नोद घेतली.

**बालिकाश्रम**

महात्मा फुलेनंतर अस्पृश्य स्त्रीच्या शिक्षणासाठीचा अद्भूत प्रयोग म्हणजे "बालिकाश्रम" होय. महात्मा गांधीच्या हरिजन संकल्पनेने भारावलेल्या जानकीबाईनी अस्पृश्योध्दाराचे कार्य १९३५ पासुनच सुरू केले होते. मात्र या कार्याला विधायक रूप १९४३ मध्ये बालिकाश्रमाच्या स्थापनेनंतर मिळाले. जानकीबाईनी हया लोकोत्तर कार्याची जबाबदारी आपल्या खांदयावर घेतली. अन्य स्त्री शिक्षण संस्थाच्या तुलनेत याचे वेगळेपण असे होते की, येथे येणा—या मुलींमध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील मागास, गरीब कुटुंबातील व परंपरेने ग्रस्त असलेल्या मुली, सवर्ण वर्गातील मुलींबरोबरच बालगुन्हेगार ठरविलेल्या मुलींनाही शिक्षण दिले जात होते.[१३] बालिकाश्रमात येणा—या मुलींबाबत जानकीबाईची जागृत दृष्टी होती. या सर्व वर्गातील मुलींमधून त्यांना जातीच्या श्रृंखला तोडणारी सक्षम गृहीणी घडवायची होती म्हणून शालेय शिक्षणाबरोबर हया मुलींमध्ये आत्मस्वावलंबनाची बीजे रूजविणाच्या हेतूने त्यांनी हस्त व्यवसाय शिक्षणालाही महत्व दिले. त्यानुसार हातमाग, सुतकताई, शिवण अशा तीन विभागात हे शिक्षण सुरू करण्यात आले. "कोडम गुरूजी , श्रीमती पाठक, श्रीमती राजहंस, श्रीमती विजयाताई मोडक, अनुक्रमे हातमाग व शिवणकामाचे वर्ग घेत".[१४] स्त्रीशिक्षणाची आत्मस्वावलंबनाची ही बाजू जानकीबाईनी आत्मियतेने उचलून धरली. स्त्री उन्नती हे सुत्र यापाठीमागे होते.

**अनाथ बालिकाश्रम**

स्त्री शिक्षणाच्या विकासासाठी महर्षी कर्वे अहोरात्र झटले. २० व्या शतकात स्त्री शिक्षणाला जिवंत ठेवण्याचे श्रेय अर्थातच त्यांना जाते. सामाजिक सुधारणेच्या जागी आलेल्या राजकीय चळवळीने पुन्हा एकदा स्त्रीविषयक सुधारणेच्या प्रश्नावर प्रश्नचिन्ह, उपस्थित होते की काय ही शंका निर्माण होऊ लागली होती. त्या काळात महर्षी कर्वेनी मुंबई पुणे आणि पुढे विदर्भापर्यंत स्त्री शिक्षणाचे जाळे उभे करण्यासाठी प्रयत्न केले, प्रोत्साहन दिले.

आतापर्यंत स्त्री शिक्षणाचा विचार करतांना त्याचे स्वरूप काहीसे मर्यादित राहिले होते. स्त्रीच्या सुशिक्षिततेची धारणा पुरूषकेंद्रित राहीली होती या धारणेवर **पहिले आक्रमण पंडीता रमाबाई, दुसरे**

५

**रमाबाई रानडे तिसरे आणि महत्वपुर्ण आक्रमण महर्षी कर्वेनी केले. स्त्रीशिक्षणाचा नवा दृष्टिकोन त्यांनी पुढे आणला. ज्याची परिणती पुढे महिला विदयापीठाच्या स्थापनेत झाली. महर्षी कर्वेच्या स्त्री शिक्षणाची दिशा काहीशी भिन्न राहीली. ज्यात स्त्रीच्या कौटुंबिक, आर्थिक आणि राष्ट्रीय दृष्टीचे प्रतिबिंब त्यांना अपेक्षित होते.** १८९४ मध्ये सुरू केलेल्या अनाथ बालिकाश्रमाचे छोटेसे रोपटे अल्पावधीतच म्हणजे १९१६ मध्ये भारतातील पहिल्या महिला विदयापीठ रूपी वृक्षात परावर्तित झाले. महर्षी कर्वेचा हा प्रयत्न परंपरा व नव विचाराच्या संघर्षातून विकसित झाला हे ही तितकेच खरे. महिला विदयापीठाच्या रूपाने स्त्रीशिक्षणाचा अध्याय नव्याने लिहला गेला.

**ब्राम्हणेत्तर स्त्री आणि शिक्षण**

बहुजन समाजात स्त्री शिक्षणाचे वारे रूजावे म्हणून महात्मा फुलेनी स्त्री शिक्षणाची सुरूवात केली. त्याचा फायदा ब्राम्हण समाजाने प्रथम घेतला. “पुण्याच्या सदाशीव पेठेत सुशिक्षीत पदवीधर महिलांचे प्रमाण २५—३० टक्क्यापर्यंत सापडते. परंतू बहूजन समाजात ते एक दीड टक्काही आढळत नाही. १९६१ च्या शिरगणतीनुसार सदाशिव पेठेत स्त्री साक्षर प्रमाण ८५% आहे तर महात्मा फुलेंचे वास्तव्य असणा—या गंजपेठेत मात्र अवघे ९%”[१५] यावरून स्त्री शिक्षणासंबंधाने बहूजन समाजाची धारणा अजूनही नकारात्मकच होती. शिक्षणाच्या बाबतीत मराठा स्त्रीला प्राप्त झालेल्या दुय्यम दर्जाच्या अनुषंगाने मराठा समाजाची सरंजामी प्रवृत्ती नष्ट होऊन ख—या अर्थाने जर या समाजाला आधुनिक युगात प्रवेश करावयाचा असेल तर “स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून असणारे आत्मभान विकसित करणारे, आधुनिक मुल्ये आत्मसात करणारे आधुनिक व विज्ञाननिष्ठ” [१६] शिक्षण देणे ही आजची निकड बनली आहे. मराठा समाजाला आपल्या भावी पिढयांचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर मराठी स्त्रीची सर्वप्रकारचा गुलामगिरीतून मुक्तता करणे गरजेचे आहे.

स्त्रीशिक्षणासंबंधाने स्वातंत्र्यपुर्व कालखंडात उच्च वर्णीय स्त्रियांमध्ये जी भावना तयार होत होती. तीच भावना स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्रातील बहूजन समाजातील स्त्री वर्गाच्या मनात घर तयार करत होती. स्वातंत्रोत्तर कालखंडातही महाराष्ट्रातील बहूजन समाजाची स्त्रीविषयक पारंपारिक धारणा बदललेली नव्हती. स्त्रीच्या कुटुंबातील स्थानाबाबत, रूढी व परंपराबाबत पुरूष वर्ग आग्रही होता त्यामुळे १९६० च्या दशकापर्यंत बहूजन वर्गातील स्त्री शिक्षणासंबंधाने मोठया प्रमाणात घराबाहेर पडू शकली नव्हती. त्या पार्श्वभुमीवर स्त्री मुक्ती चळवळीच्या विचारधारेने आणि राजकारणातील वाढत्या सत्तासंघर्षामुळे स्त्री शिक्षणाबाबत फेरविचार महाराष्ट्रात पुरूष वर्गात सुरू झाला त्याला १९७० च्या दशकात फळे येऊ लागली. १९७० च्या दशकानंतर महाराष्ट्रातील स्त्री वर्ग मोठया प्रमाणात शिक्षण क्षेत्रात येऊ लागला. शिक्षणासंबंधाने स्त्री वर्गाची निश्चित दृष्टी तयार होऊ लागली. विशेषत: मराठा समाजातील स्त्रीच्या विचारात सामाजिक व धार्मिक अंगाने परिवर्तनाची चाहूल वाटचाल करू लागली. ज्यात “समानतेच्या विचारांना, स्त्री पुरूष सहशिक्षणाला, धर्मविचारांना नाकारण्याच्या प्रवृत्तीला”[१७] स्थान होते.

मराठा समाजातील स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात मागे पडण्याची कारणे विशद करतांना मीनल जगताप सांगतात की, “मराठा समाजाने “स्त्रीच्या कौमार्याला व जात प्रतिष्ठेला” अधिक महत्व दिले. मुलींकडे परके धन म्हणून बघण्याची प्रवृत्ती, वंशपरंपरेबाबतचा अवास्तव अभिमान, स्त्रीकडे उपभोग्य वस्तु म्हणून बघण्याची दृष्टी, घराण्याची प्रतिष्ठा यामुळे पारिवारिक आणि सामाजिक जीवनात स्त्रियांचे स्थान दुय्यम लेखले गेले”[१८] स्त्री शिक्षणाची दुसरी महत्वाची अडचण म्हणजे मराठा स्त्रीचे शेतीशी जुळलेले नाते आहे. वर्षातून दोनवेळा हंगाम असल्याकारणाने साहजिकच शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.[१९]

सुधारकांच्या स्त्री शिक्षणाचे महत्व अधोरेखित करतांना अरूणा ढेरे म्हणतात, “या प्रागतिकांनी कल्पिलेले स्त्री शिक्षण म्हणजे निव्वळ औपचारिक असे शालेय शिक्षण नव्हते. स्त्रीला समाजाशी, राष्ट्राशी आणि एकुणच जगाशी जोडून देण्याची ती एक सुंदर प्रक्रीया होती. ………. अशा स्त्रिया

समाजाच्या विविध क्षेत्रांत जेव्हा आत्मविश्वासाने वावरू लागल्या तेव्हा स्त्रीत्वाच्या हया दर्शनाने समाज मन भारले गेले, खरे तर हया शिक्षणाचा दुहेरी परिणाम होता. त्याचा एक पदर शिक्षणोत्सुक स्त्रीशी संलग्न होता आणि दुसरा तिच्याशी संबंध्द अशा समाजाशी संलग्न होता. पुर्वीच्या दबलेल्या, अडाणी, असहाय अशा दुबळया स्त्री मधून शिक्षणाने ज्या निर्भय, चैतन्यमुक्त आणि आत्मविश्वासपुर्ण अशा स्त्रीचे अवतरण घडवले होते तिच्याकडे पाहण्याची आणि तिच्या मधल्या या परिवर्तनाचे अर्थ समजण्याची दृष्टी ही समाजाला बहूतांशी आधुनिक शिक्षणातून मिळत गेली".[२०]

**धर्माचार आणि स्त्री**

धर्मसुधारणा चळवळीमुळे स्त्रियांचा धार्मिक आचारांकडे बघण्याचा दृष्टीकोनही बदलू लागला होता. यासंबंधाने "गृहीणी रत्नमालात" प्रसिध्द झालेली दोन पत्रे महत्वाची आहेत. एक कमलाबाई तावडे (इंदोर) (१९१६), दुसरे कृष्णाबाई जव्हेरे (१९२७) यांचे. पहिल्या पत्रात लेखिका हरतालिका व्रता संबंधाने लिहतांना म्हणते की, "आम्ही जी व्रते, उदयापने करतो ती करण्यापूर्वी आम्ही त्यासंबंधी माहिती मिळवून ते केले असता फलद्रुप होते ती न समजून केलेली फल देत नाही. शेवटी हेच सांगणे की, आधी विचार करा, म्हणजे काही करणे आहे ते करत चला", याच भूमिकेचा अधिक गर्भित आशय कृष्णाबाईच्या पत्रात दिसतो. ज्यात पुराण कथांचा नव्याने अर्थ लावण्याची अपेक्षा त्या व्यक्त करतात.[२१] तर ताराबाई मोडक "सौभाग्य लक्षण" समजल्या जाणा—या कुंकू लावण्याच्या चालीतचं स्त्रियांची गुलामगिरी असल्याचे म्हणत, कुंकवाचा गर्भित अर्थ स्पष्ट करतांना त्या म्हणतात, "सौभाग्य दर्शक कुंकू व त्यामुळे स्त्रियांना मिळणारे सौभाग्य पद याचा खरा अर्थ काय आहे याचे पृथक्करण केले तर त्यात असा अर्थ निघतो की, एका स्त्रीला नाथ आहे, मालक आहे व दुसरी स्त्री अनाथ आहे. त्यामुळे कुत्र्याच्या गळयातील पट्टा व स्त्रीच्या कपाळावरील कुंकू या दोहोत फारसा फरक नाही. .................. म्हणून स्त्रियांस स्त्री या नात्याने समग्र समाजात योग्य स्थान मिळवू इच्छिणा—या स्त्रियांनी पुरूषावलंबित सौभाग्यपदाचा व त्यायोगे मिळणा—या श्रेष्ठतेचा त्याग केला पाहिजे. कुंकू हे कशाचे दयोतक आहे. याचा विचार केला पाहिजे. त्यास शोभारूप न मानता आपल्या हीन पदवीचे समर्थन करणारे मानले पाहिजे".[२२] प्रवास करणा—या विधवेकडे कुदृष्टीने बघण्या—या पुरूषांच्या संबंधाने विधवांना प्रवासादरम्यान कुंकू लावण्याचा अधिकार असावा हया विचाराला सडेतोडपणे उत्तर देतांना त्या म्हणतात, "यापेक्षा सर्वच स्त्रिया कुंकू लावण्याचे सोडून देऊन स्वतःच हातात मोठा दंडा घेऊन प्रवासास निघतील तर त्यात स्त्री जातीची जास्त शोभा नाही का?."[२३]

"स्त्री स्वातंत्र्यासाठी गुलामीच्या प्रतिकांना नाकारून व्यक्ती म्हणून स्त्रियांनी पुढे यावे हा विचार अधोरेखित करून ताराबाई मोडक काळाच्या फार पुढे जातांत कारण २१ व्या शतकातील स्त्री अजूनही ताराबाईच्या हया विचारांना स्विकारत नसल्याचे दिसून येते".

व्रतवैकल्यासंबंधाने नव्याने विचार करतांना देवदर्शनाला जाणे किंवा पोथी वाचणे यात थोडा तरी अर्थ आहे का असा प्रश्न उपस्थित करून सरला करमरकर पुढे सुचवितात की "यापेक्षा आपला वेळ आणि पैसा सत्कारणी लागेल व आपल्या ऐपतीप्रमाणे गरीबगुरीबांना मदत करता येईल............. ..एखादया गरीबाच्या मुलाला किंवा मुलीला मी साक्षर करीन हा तर नियम देवापुढे वाती जाळण्यापेक्षा कितीतरी उपयोगी आहे. रोज तास दोन तास सूत काढले तरी सुध्दा आपण आपल्या श्रमाचे वार दोन वार कापड मिळवू शकू. कालानुरोधाने रूढी, चालिरिती आणि धार्मिक भावनाही बदलत असतात त्याकडे दुर्लक्ष करून हट्टीपणाने जुन्यालाच चिकटून राहण्यापेक्षा जसा काळ बदलेल तसे फिरणे समंजसपणाचे आहे".[२४]

स्त्री जागृती करण्याची नवनवी माध्यमे जानकीबाई आपटे वापरीत. जसे, हिंदू रूढीनुसार अधिक महिन्यात ब्राम्हणाला दीपदान करण्याची पध्दत आहे. ...........अशा दानाचा ब्राम्हणाला उपयोग

होण्यापेक्षा या वस्तु वाया जातात असा अनुभव आहे. म्हणून त्यांनी ब्राम्हणाला असे निरर्थक दीप दान न करता नगरच्या अनाथ विदयार्थी गृहातील विदयार्थ्यांना रात्री अभ्यासासाठी पेट्रोमॅक्सचा दिवा दिला त्यासोबत त्यांनी गुढी पाडव्याला पारंपारिक गुढी न उभारता तिरंगा झेंडा उभारून वाडयातील स्त्री पुरूषांसोबत झेंडावंदन करित[२५] जानकी बाईप्रमाणेच महाराष्ट्रात १९३० च्या दशकात महाराष्ट्रात झेंडा गुढी उभारण्याची प्रथा स्त्रियांनी सुरू केली. हे अर्थातच स्त्रियांमधील राजकीय जागृतीचे, त्याबरोबरच अप्रत्यक्षपणे पारंपारिक रितीरिवाजांना अप्रत्यक्षपणे नाकारण्याचे पदचिन्ह होते. जानकीबाईंनी आपल्या मुला—मुलींची लग्ने चाकोरीबाहेर जाऊन १९३८—४६ या काळात नोंदणी पध्दतीने केली. कोणत्याही लग्नात कुंडली पाहिली गेली नाही अर्थातच मुला —मुलींच्या पसंतीना प्राधान्यक्रम देण्यात आला.[२६]

विधवांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याची अजूनही गरज होती हे जानकीबाईकडे येणा—या माया व कांता हया दोन विधवांच्या जीवनावरून दिसते. पैकी माया ही पुनर्विवाहास इच्छूक असल्याचे दिसताच जानकीबाईंनी तिला व तिच्या कुटुंबाला धीर देत तिचे पुनर्विवाह करण्यासंबंधाने तिच्या कुटुंबाचे मन वळविले. मायाला केस वाढविण्याचे व कपाळी कुंकू लावून तिला अशा रितीने वागण्याचे धैर्य निर्माण केले. कांता भोंग हिला कपाळी काळा गंध लावण्याची सवय लावली. हया दोन्ही घटना धार्मिक आचार आणि जीवन व्यवहाराकडे बघण्याची स्त्रियांची दृष्टी बदलत चालल्याचे दर्शक होते.[२७]

यशोदाबाईंचा सार्वजनिक जीवनातील कामाचा आवाका बराच मोठा होता. विचारांपेक्षा कृतीशिलतेवर त्यांनी अधिक भर दिला. महिलांना पुढे येण्यासाठी त्यांनी सार्वजनिक उपक्रमांमध्ये हात घातला, जे स्त्री उन्नतीसाठी पोषक ठरणारे होते. याव्दारे शिक्षण, धार्मिक परंपरासंबंधीची जागृती, विधवांमध्ये आत्मचैतन्य निर्माण करण्याची त्यांची धडपड विलक्षण होती. दैनंदिन जिवनव्यवहाराच्या चाकोरीबाहेर जाण्याची त्यांची ही धडपड स्त्री वर्गात चैतन्य, चेतना व आत्मविष्वास निर्माण करणारी होती, हे त्यांच्या कार्यावरून दिसुन येते.

१९३८ मध्ये स्त्रियांनी हळदी कुंकू कार्यक्रम आपापल्या घरी न करता हिंद सेविका समाजाच्या सार्वजनिक हळदीकुंकूवास सहभागी होण्याच्या त्यांच्या आवाहनास महिलांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यांच्या हया उपक्रमाचा महिलांवर प्रभाव पडला.[२८] हिंद सेविका संघाच्या माध्यमातून विविध सार्वजनिक उपक्रमांतून जानकीबाई आपटे महिलापर्यंत पोहचत होत्या, प्रेरणा देत होत्या. हया प्रेरणामुळे सार्वजनिक क्षेत्रात महिलांनी मुक्तपणे वावर करायला पाहिजे. ही कल्पना उदयास आली. १९३० च्या दशकात महिलांमध्ये व्यक्तीगत स्वातंत्र्याची भावना उदयास येऊ लागली होती. हे उमाबाई आपटेनी हिंद सेविका सभेत मांडलेल्या विचारांतून जाणवून येते.

स्त्री आत्मनिर्भर व्हावी ही जानकीबाईंची तळमळ होती हे त्यांच्या विचारांत व कृतीत वेळोवेळी जाणवते. त्या म्हणतात, आजपर्यंत स्त्री ही निव्वळ अबला म्हणून तिला घरातच डांबून ठेवले गेले आहे. त्यामुळे आपल्या समाजाचे एक अंग लुळे पडले आहे. आपल्याला प्रपंच सांभाळून आपला उध्दार करायचा आहे. स्त्रियांनीच स्त्रियांचा उध्दार केला पाहिजे. जो दुस—यावर विसंबला त्याचा कार्यभाग नासला. तेव्हा बायांनो शहाण्या व्हा तुम्ही शहाण्या झालात की तुमची मुले बाळे शहाणे होतील. सर्व स्त्रियांची जातीची उच्चनिचता, श्रीमंत गरिब हा कृत्रिम भेद सोडून आपली संघटना बळकट केली तर जगात अन्याय जुलूम राहणार नाही.[२९]

उपवास, व्रताचार, पुजाअर्चा, मराठा स्त्रीच्या धार्मिक जीवनाचे अंग बनले आहे. पतिव्रता धर्माच्या पालनातून हया धार्मिक आचारांना मराठा स्त्री जीवनात अतिशय मोलाचे स्थान आहे. कुंकू , मंगळसुत्र ही हया धर्माची प्रतिके मराठा स्त्रीला प्राणाहून प्रिय बनली. “सदा सौभाग्यवती” राहण्याच्या भोळया धर्मकल्पनेने मराठा स्त्री वर्गाची धर्म कल्पनाच मुळात ब्राम्हणी कुशीचे पाठराखण करणारी राहिली. ही धारणा आजही ग्रामीण महाराष्ट्रात प्रामुख्याने दिसून येते. हया धारणेचे स्त्री कसे समर्थन करते हे मिनल जगताप सांगतात, “नवरा कसाबी असू दे, हानु दे, मारू दे, पण तो आहे म्हणून

आपण आहे. तो नसल्यावर आपल्याला कोण विचारतो? कचराच होतो".[३०] हया धारणेला शिक्षीत मराठा स्त्री मात्र विरोध करते पुरूषी धर्माला नाकारून स्त्री धर्माच्या स्थापनेची आकांक्षा हया स्त्री मध्ये जागृत होते. विशेषत: शिक्षीत नवतरूण स्त्री वर्ग धर्माच्या जोखडानांच नाकारतो. धर्माऐवजी हया वर्गाचा कायदयावर अधिक विश्वास आहे. स्त्री धर्मामध्ये हया स्त्रियांना कुटुंबात व समाजात मानाचे स्थान, विचारांना निर्णय प्रक्रियेत स्थान, नोकरीचे स्वातंत्र्य, एक व्यक्ती म्हणून दर्जा, व्यक्तीगत विकासाच्या संधी हया बाबी अपेक्षित आहे.[३१]

**"२१ व्या शतकाच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या शिक्षीत महाराष्ट्रीय स्त्रीची धर्मकल्पना अतिशय प्रगल्भ अवस्था दर्शविणारी आहे. मात्र ही भावना २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत विकसित झाली नाही. त्यामुळे उच्च वर्णीय धर्मकल्पनांमध्ये घडून आलेल्या परिवर्तनाची चाहूल महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर स्त्री वर्गाला लागली नाही. धर्माची मोक्ष संकल्पना, पतिव्रता धर्म, आणि त्यासाठी आवश्यक असणारी कर्मकांडीय प्रणाली यातून महाराष्ट्रीय बहूजन स्त्री बाहेर पडू शकली नाही. कदाचित स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात या समाजाने उशीरा टाकलेल्या पावलांचा तो परिणाम होता**".

**आर्थिक स्वावलंबन**

आर्थिकदृष्टीने स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने किंवा स्वत: काहीतरी कामधंदा करून कुटुंबास आर्थिक हातभार लावण्याचा विचार याच काळात स्त्री मध्ये उदयास येऊ लागला होता. त्यादृष्टीने संघटित पातळीवर प्रयत्न करण्यास सुरवात झाली होती. रमाबाई रानडेचे सेवासदन, यशोदाबाई आपटयांची सहकारी चळवळ किंवा याच धर्तीवर असलेले कमलाबाई देशपांडे यांचे महिला सहकारी भांडार हया संस्था स्त्रियांमध्ये आर्थिकदृष्टया आत्मभान जागृत करणा—या होत्या. परावलंविबत्वाची पारंपारिक धारणा मोडीत काढणा—या पुरूषी आर्थिक प्रभृत्वाशी समांतर आर्थिक हितसंबंधीय संरचना उभी करण्याचा होता. या संस्था चळवळींनी उभे केलेले उपक्रम ब—याच अंशी कौटुंबिक जीवनाशी साधर्म्य साधणारे असल्याने अशा उपक्रमांना स्त्री वर्गाकडून फारसा विरोध ही झाला नाही. या उपक्रमांमुळे स्त्रीयांना आणखी एक बाब उमजली ती ही की, अशा प्रयत्नांमुळे त्यांचा कौटुंबिक दर्जा ही वाढतो.

हया पार्श्वभुमीवर स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनासाठी कार्य करणा—या भावना अधिक बोलक्या होत्या. काशीबाई कानिटकर म्हणतात, "सेवासदनाच्या योगे आज अनेक गरिब, निराश्रीत स्त्रियांना अब्रूने अन्नवस्त्र मिळते आहे. अनाथ अल्पवयी मुलींना एखादा धंदा शिकून विदया शिकून मान्यतेने जगात वागण्याला मिळते आहे".[३२]

रमाबाईनी १९१२ मध्ये पुण्यात स्त्रियांच्या कला कौशल्यांच्या वस्तुचे प्रदर्शन भरविले. या प्रदर्शनापाठीमागे सेवासदनासाठी आर्थिक निधी गोळा करणे हा असला तरी त्याहीपेक्षा उदात्त अशी स्त्री जाणिवांना मुक्तपणे व्यक्त करण्याची संधी देण्याची भावना यापाठीमागे होती. हे प्रदर्शन भरविण्यापाठीमागचा उद्देश सांगतांना विव्दांस म्हणतात, "स्वावलंबनाची गरज असणा—या किंवा हौसेलाही शिकणा—या स्त्रियांना सेवासदन संस्थेकडून शिवणकाम, नोकरीचे व सुताचे विणकाम, कलाबतूचे काम, इत्यादि कलांमध्ये मिळणा—या ज्ञानाचा व शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि पुणे सेवासदन संस्थेला द्रव्यसहाय्य लाभावे" हा होता.[३३] संस्थेला या प्रदर्शनातून ३५०० रूपये मिळाले. रमाबाईच्या हया उपक्रमाची दखल घेतांना डॉ. वेशाली पवार म्हणतात. "अशा उपक्रमामुळे प्रतिष्ठित संसारी स्त्रियांनी स्त्री उन्नती व स्त्री शिक्षण या कार्याला द्रव्य साहाय्य मिळवून देण्याच्या सार्वजनिक कार्यासाठी जनसमुदायापुढे येणे. ही प्रथा प्रस्थापित झाली. फॅन्सी फेअरचा प्रमुख हेतू स्त्रियांमध्ये कला कौशल्य यांचा प्रसार आणि वस्तू संबंधी आवड निर्माण करणे हा होता तशा वस्तू सुस्थितीतील स्त्रियांनी हौसेने तयार करावयास शिकाव्या तसेच गरजूं स्त्रियांना अर्थाजनासाठी त्या तयार करण्याची इच्छा उत्पन्न व्हावी हा होता". तो सफल झाला.[३४] सेवासदनाचे महत्व अधोरेखित करतांना हया

९

पाठीमागचा हेतू स्पष्ट करतांना कमलाताई देशपांडे म्हणतात, आम्ही काही भगिनींनी सहकारी पध्दतीने खास स्त्रियांनीच असे एक दुकान चालवायचे ठरविले. व्यापार धंदयात अजून बायका शिरलेल्या नाहीत. तेव्हा या धंदयातील बरेवाईट अनुभव त्यांना मिळून नविन उदयोगही मिळेल हा उद्देश होता… …………त्याशिवाय, हया उपक्रमाचा आणखी एक फायदा झाला. तो म्हणजे ऐकीकडे छोटया छोटया संसाराची सोय झाली तर दुसरीकडे या वस्तू तयार करणा—या गरीब बायकांच्या संसारांना आर्थिक मदत झाली. पुष्कळ बायकांना स्वंयप्रकाशित दुसरे जग ठाऊक नसते. महागाईमुळे मिळकत पुरी पडत नाही. दुसरे काही करावे तर इभ्रत आड येते. त्यांच्या फुरसतीच्या वेळात आम्ही जिन्नस तयार करून घेतो व त्याचा मोबदला त्यांच्या पदरात पडतो.[३५] पारिवारिक प्रतिष्ठेला धक्का न पोहचता स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनाचे असे मार्ग निश्चितच अभूतपुर्व होते.

**"सेवासदनाच्या माध्यमातून रमाबाईनी रानडेंच्या उदारमतवादी विचारांना त्यांच्या पश्चातही जिवंत ठेवले. स्त्री स्वातंत्र्याची सुरूवात करण्याची पहिली प्रक्रीया सेवासदनने पार पाडली. अर्थात या स्वातंत्र्याची पायाभरणी महात्मा फुलेंनी केली होती. तरीही स्त्री प्रश्नांना कृतीप्रवणतेत उतरवून रमाबाईनी या प्रश्नांना निश्चित दिशा दिली. १९ व्या शतकातील विचार अशाप्रकारे २० व्या शतकात प्रत्यक्षात उतरविण्याची धडपड सुरू झाली. रमाबाई हया प्रवृत्तीच्या मुख्य मार्गदर्शक बनल्या, सेवासदन पुढे अनेक संस्थासाठी विविधांगाने मार्गदर्शकच ठरले. त्याच्या प्रेरणामुळे महाराष्ट्रीय स्त्री वर्गात नव्या उर्मीला प्रारंभ झाला."**

साधारणत: १९३० च्या दशकात महाराष्ट्रीय स्त्री नोकरी व्यवसायासंबंधाने घराबाहेर पडली. अर्थात या कामांचे स्वरूप समाजाव्दारे निश्चित केले गेले होते.[३६] त्याबरोबर व्यवसायासंबंधाने करण्यात येणा—या प्रयत्नांचे कार्यक्षेत्र ही "गृह" हेच होते. रमाबाई, यशोदाबाई, कमलाबाई यांच्याव्दारे सुरू करण्यात आलेल्या व्यवसायातून गृहकृत्यानंतर मिळणा—या फावल्या वेळात घरात बसुन करावयाच्या कामासंबंधीचे उदयोग दिसून येतात, जसे, चकल्या, लोणचे इत्यादी. सार्वजनिक जीवनात पैसा कमविण्यासाठी स्त्रीने घराबाहेर पडू नये असा अलिखीत संकेत स्वातंत्र्यापर्यंत होता. हे रमाबाई पटवर्धनाच्या "रंगभूमी" या पत्रातून व्यक्त होते.[३७] स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनाची संकल्पना स्वातंत्र्यापर्यंत समाजमनात रूजली नव्हती. स्वातंत्र्यानंतर मात्र यात बदल झालेला दिसतो. नोकरी बरोबर गायन, नृत्य, नाटक या सर्वच क्षेत्रात स्त्रिया उत्साहाने प्रवेश करू लागल्या, १९७० च्या दशकात तर स्त्रीने नोकरी करणे हे प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले.

एक आणा परिषदेच्या माध्यमातून जानकीबाईंनी स्त्रियांमधील सुप्त भावनांना नवी दिशा दिली. या परिषदेत केलेल्या स्वागतपर भाषणात स्त्री उन्नती स्त्री व्दारे शक्य असल्याचा विचार[३८] मांडून स्त्रियांनी विधायक कार्यात स्वत: पुढे येण्याचे आवाहन केले. या परिषदेचे दुसरे वेगळेपण असे की, कोणतीही संस्थात्मक जोड नसतांना विविध जातवर्गीय स्तरातून आलेल्या स्त्रियांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन या परिषदेत भरविण्यात आले. सेवासदन प्रमाणे स्त्रियांमध्ये आर्थिक स्वावलंबनाची जाणीव निर्माण करून देणारी ही एक महत्वपुर्ण संस्था होती. तर सहकारी तत्वावर कार्य करणारी ही बहूधा पहिली संस्था असावी.

**महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर वर्गाचा मुख्य व्यवसाय शेती हा असल्याने साहजिकच ब्राम्हणेत्तर स्त्रीची शेतीशी नाळ जुळलेली होती. कृषी कार्याशी निगडीत असलेल्या हया वर्गाची आर्थिक आधारावर स्तरीय सामाजिक व राजकीय संरचना निर्माण झाली. हे स्तर वतनदार, जहागीरदार, पाटील, मिरासदार व उपरा हया पारंपारीक जडणघडणीतून विकसित झाले. जातसंबंधीय संरचना एक असली तरी अर्थकारणीय संकल्पनेतून ब्राम्हणेत्तर वर्गातील प्रभुत्वाची धारणा हया आर्थिक चौकटीत विकसित झाली त्याचा अर्थकारणांवर बराच प्रभाव पडला. "घरंदाज स्त्री व कष्टकरी स्त्री" हया मराठा स्त्रीच्या दोन कक्षा अर्थकारणातही कार्यरत राहिल्या, ज्याचा सरळ अर्थ होता आर्थिकदृष्टया परावलंबन.**

१०

**शिक्षणाच्या क्षेत्रात मजल मारेपर्यंत हे आर्थिक परावलंबन पुरूष केंद्रित राहिले. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात हया केंद्रित्वाच्या धारणेला तडे जाऊ लागले. त्याचा स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनाला काही अंशी फायदा होऊ लागला. ब्राम्हण स्त्री प्रमाणे ब्राम्हणेत्तर स्त्री अर्थकारणासंबंधाने व्यवसाय क्षेत्रात उतरली नसली तरी नोकरी क्षेत्रात मात्र तिने पाऊल टाकले. ब्राम्हणेत्तर स्त्रीच्या आर्थिक स्वावलंबनाची ही पहिली नांदी ठरली.**

श्रीमंत, मध्यम शेतकरी, सामान्य शेतकरी व शेतमजूर स्त्रियांचा तुलनात्मक अध्ययन पध्दतीचा वापर करून त्या आधारावर मिनल जगताप म्हणतात, “शेतीत मजूरी करणा—या स्त्रियांच्या मजूरीवर त्यांच्या पतीचा अधिकार असतो. सर्वांत वाईट अवस्था शेतमजूरी करणा—या स्त्रियांची असते त्यात विधवा व परितक्त्या स्त्रीच्या स्वप्नातही आर्थिक स्वावलंबन येत नाही. उलट लैंगिक शोषणाची भिती हया स्त्रियांत अधिक असते”.[३९] नोकरी करणा—या स्त्रियांना समाजात मानाचे स्थान असले तरी नोकरीचे क्षेत्र प्रामुख्याने शिक्षण व त्याखालोखाल वैदयकीय हेच आहे. त्यामुळे हया स्त्रियांमध्ये व्यवसाय स्वातंत्र्य मर्यादित असेच राहीले. हया दोन्ही बाबींमध्ये महीलांचे आर्थिक स्वातंत्र्य जेमतेम राहिले.[४०]

२० व्या शतकाच्या पुर्वार्धात सामाजिक सुधारणासोबतच स्त्रियांमध्ये सांपत्तीक हक्कासंदर्भात ही जागरूकता येत होती. हा हक्क मिळावा यासाठी सार्वजनिक पातळीवर वृत्तपत्रातून लेखनाव्दारे चर्चा करण्यास स्त्रियांनी सुरवात केली. यासंदर्भात लक्ष्मीबाई कामत यांचे ६ मे १९१३ च्या केसरीतील पत्र अतिशय बोलके आहे. यात त्या म्हणतात “आम्ही आईबापांस सोडून दुस—याच्या घरी जाणार म्हणून आम्हांला आमच्या आईबापांच्या इस्टेटीचा वाटा किंवा हक्क मिळत नाही. सासरच्या घरी गेल्यानंतरही दुस—याच्या घरून दुस—याच्या रक्ताची आलेली म्हणून इकडील इस्टेटीवरही त्यांचा हक्क किंवा वाटा नाही......खरेतरं द्रव्य व बुध्दी यांची संपन्नता अथवा असल्याशिवाय इतर कला कौशल्यांचे ज्ञान संपादन होणे शक्य नाही”.[४१] वारसा हक्काबाबत महाराष्ट्रात मुखत्वे पुत्रसिध्दांताचे अधिक प्रचलन राहिले. मराठा समाज रचनेचे सरंजामी पितृसत्ताक स्वरूप राहिल्याने तसेच मुलीकडे परके धन म्हणून बघण्याचा प्रवृत्तीने वारसा हक्काबाबत स्त्रिया उत्सुक दिसुन येत नाही. शिवाय तो आपल्याला मिळावा ही भावनाही मराठा स्त्री मध्ये जाणवत नसल्याचे मिनल जगताप म्हणतात.[४२]

**राजकीय जागृती**

स्वातंत्र्यपुर्व काळात स्त्रियांमध्ये राजकीय जागृती येऊ लागली अर्थात याचे पडसाद कॉंग्रेसच्या पुणे अधिवेशनात दिसतात. पंडीता रमाबाईंनी पुण्यातील अधिवेशनावेळी आठ महिला सदस्यांचे मंडळ यासाठी तयार केले होते. तरीही स्त्रियांमधील राजकीय जागृतीचा पहिला अविष्कार टिळकांच्या राजद्रोह खटल्यावेळी दिसून आला. रमाबाई रानडेंच्या नेतृत्वाखाली मुंबईत जी सभा झाली व लक्ष्मीबाई टिळकांना सहानुभुती देणारे पत्र या सभेच्या वतीने देण्यात आले त्यावरून स्त्री वर्गात राजकारणासंबंधाने विचार करण्याची दृष्टी आली होती. हे दिसते या दृष्टीला मुर्त रूप महात्मा गांधीनी दिले. स्त्रियांना राष्ट्रीय चळवळीत समग्रतेने सहभागी करून घेण्याची दृष्टी त्यांनी दिली. महाराष्ट्रात याचे प्रतिनिधीत्व करणा—या महिलांमध्ये अवंतिकाबाई गोखले, उषा मेहता, दुर्गाबाई देशमुख, मृणालिनी देसाई, सुनिता देशपांडे, सरोजिनी बाबर यासारख्या महिला प्रकर्षाने पुढे आल्या. शिक्षीत महिलांबरोबर ग्रामीण अशिक्षीत महिलाही राष्ट्रीय आंदोलनात सहभागी होऊ लागल्या. यांचा दुरगामी प्रभाव स्त्रियांवर झाला. पुढील काळात उदयास आलेल्या कामगार, दलित मुक्ती, शेतकरी चळवळी असो किंवा हैद्राबाद, गोवा मुक्ती संग्राम असो. स्त्री सहभाग प्रकर्षाने दिसून आला. गांधीयुग त्याची निश्चित नांदी होती.

स्त्री स्वातंत्र्यासंबंधाने महात्मा गांधीचे वेगळेपण अधोरेखित करतांना रेखा ठाकुर आपल्या गांधीविचार आणि स्त्री प्रश्न या लेखात म्हणतात की “केवळ समाज धुरीणांमध्ये आणि वरिष्ठ

वर्तुळामध्ये साधकबाधक चर्चेचा विषय ठरलेला स्त्री समस्यांचा विषय थेट जनसमुदायामध्येच गांधीनी नेऊन ठेवला. …….गांधीजींचे दुसरे महत्वाचे वेगळेपण सांगतांना त्या म्हणतात, स्त्री बंदिस्तीकरणाचे प्रतिक बनलेल्या देहाच्या वस्तुकरणामुळे स्त्रीची आत्मीक प्रगती खुंटली ते देह वस्तुकरण नाकारण्याची, स्वत:चे बाहूलीपण नाकारण्याची दृष्टी महात्मा गांधीनी स्त्री वर्गाला दिली. समताधिष्ठित संरचनेच्या प्रवाहात येण्यासाठी महात्मा गांधीनी केलेले प्रयास हे सुधारणा चळवळीचे पुढचे क्रांतिकारक पाऊल होते.''[४३]

१९३० च्या आंदोलन कालखंडात यशोदाबाई स्वातंत्र्यचळवळीशी अप्रत्यक्षरित्या जोडल्या गेल्या. डॉ. कवी व श्री केशवराव गरूड यांच्या मदतीने त्यांनी १९३० साली हिंद सेविका संघाची स्थापना केली. या संस्थेचे महिलांना जागृत करणे व राष्ट्रीय चळवळीला सन्मुख करणे हे उद्‌दिष्ट ठरविण्यात आले. त्यासाठी महापुरूषांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविण्यात आले……………हिंद सेविका संघाच्या व्यासपीठावरून यशोदाबाईंनी समाजातील सर्व जाती व थरातील स्त्रियांमध्ये राष्ट्रीय आंदोलनासबंधाने जागृती घडवून आणण्यावर भर दिला.[४४] पुढे फैजपूर अधिवेशनासाठी त्यांनी पंधरा महिलांचे शिस्तबध्द पथक तयार करून हया अधिवेशन काळात कार्य केले. महिलांमधील नेतृत्व गुणांची क्षमता दाखविण्याचे असे धारिष्टय दाखविणा—या पंडीता रमाबाईनंतर हया दुस—या महिला होत्या.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महिलांचा राजकीय सहभाग बव्हुंशी पक्षीय संघटन क्षेत्राशी निगडीत होता. अर्थात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर झालेल्या १९६२ व १९६७ च्या निवडणूकीतून महिलांचे प्रतिनिधीत्व करण्या—या अनुक्रमे १३ व ०९ महिला विधान सभेवर निवडून गेल्या. मात्र हे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत नगण्य म्हणजे ४.९२ टक्के व ३.३३ टक्के इतकेच होते. असे असले तरी १९६७ च्या निवडणूकीत निवडून आलेल्या निर्मलाराजे भोसले हया पहिल्या महिला मंत्री बनल्या.[४५] यावरून राज्याच्या राजकारणात महिला सहभागास सुरवात झाली होती. हे जरी खरे असले तरी प्रत्यक्ष राजकारणापेक्षा राजकीय पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर महिला सहभाग मोठया प्रमाणावर होता. त्यामुळे महीलांच्या सार्वजनिक हिताच्या प्रश्नाकडे फारसे लक्ष या काळात दिले गेले नाही. यापाठीमागे असलेल्या कारणांची चर्चा करतांना डॉ. वैशाली पवार म्हणतात की, ''या कालखंडातील राजकारणावर पुरूषांचे नियंत्रण असल्याने त्यांनी स्त्री वर्गाच्या राजकीय सहभागावर बहिष्कार घातला होता. समाजाची वृत्ती सरंजामी असल्याकारणाने महिलांना राजकारणात येण्याची संधी मिळत नव्हती. त्यामुळे पक्षीय राजकारण स्त्रियांच्या राजकीय सहभागाकडे तेवढया उत्सुकतेने बघत नव्हते''.[४६] ही अनुउत्सुकता स्वातंत्र्यानंतरच्या ५० वर्षात फारशी बदलली नाही. हे आकडेवारी वरून (अकरा निवडणूकामध्ये ११७ महिला व ३१०८ पुरूष निवडून आले) डॉ. वैशाली पवार अधोरेखित करतात.[४७]

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रीयामध्ये स्त्री सहभागाची तशी वानवाच राहिली. १९९३ च्या ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीन्वये ३३ टक्के आरक्षण मिळेपर्यंत स्त्रियांचा राजकारणातील सहभाग नगण्य राहिला. त्यामुळे या काळातील लोकशाहीसमोर महिला वर्गात विस्तार करण्याचे आव्हान अधोरेखित झाले. ''या काळात महिला मतदार होत्या मात्र त्यांना राजकीय सहभागाची संधी उपलब्ध नव्हती''.[४८] तरी १९८० च्या दशकात मात्र महिला वर्ग राजकारणात प्रकर्षाने पुढ येतांना दिसतो. ही प्रकर्षता कशात होती याची नोंद घेतांना डॉ. वैशाली पवार यांनी महिलांच्या अराजकीय चळवळीतील वाढत्या सहभागावर बोट ठेवले. त्याचबरोबर कॉग्रेसेत्तर पक्षांनी महिलांना दिलेल्या संधीमुळे महिला राजकारणात सक्रीय होऊ लागल्या.[४९]

''राजकारणाच्या या सत्ता समीकरणापासून स्वतंत्ररूपातील मराठा /ब्राम्हणेत्तर स्त्री निश्‍चितपणे दूर राहिली, वंचित राहिली. हयाला <u>एक</u> स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या राजकरणाची सुत्रे मराठा वर्गाच्या

हाती आली. दोन मराठा समाजाची स्त्रीबाबतची दृष्टी पतिव्रता, पावित्र्य आणि सेवा करणारी अशीच बनून राहिली. तीन राजकरणाबाबतचा मराठा स्त्रीचा नकारात्मक दृष्टीकोन चार मराठा समाजांची सरंजामी प्रवृत्ती आणि पाच मराठा स्त्रीचा अशिक्षितपणा हयामुळे महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर समाजातील स्त्री राजकारणात प्रकर्षाने जाणवली नाही. त्या तुलनेत मतदानाच्या अधिकाराबाबत ब्राम्हणेत्तर स्त्रीमध्ये अधिक सजगता होती. पण ही सजगता राजकीय दृष्टीपेक्षा व्यक्तीगत पातळीवर होती". [५०]

**समारोप**

२० व्या शतकात शिक्षित स्त्री वर्गाने स्त्री उन्नतीची मोहीम हाती घेतली. 'सेवासदन' त्याचे आदय रूप होते. सुधारकांनी हाताळलेल्या प्रश्नांसोबत स्त्री हक्कांच्या विचाराचा उदय या कालखंडात झाला. 'व्यक्ती' म्हणून जीवन जगण्याचा किमान हक्क मिळविण्यासाठी जागृत स्त्री वर्ग भांडू लागला, चळवळी, आंदोलने, महीला संघटन करू लागला. एकप्रकारे 'स्त्री आत्मभानाचा' उदय या कालखंडात झाला. भारताच्या इतिहासात ही प्रक्रीया पहिल्यांदाच घडून येत होती. या आत्मभानाविषयी स्त्री वर्ग अतिशय जागरूक होता. शिवाय ते टिकवून ठेवण्यासाठी पुरूषी सहकार्याची अपेक्षा हया कालखंडातील स्त्रीने धरली नाही हे याचे महत्वपुर्ण वैशिष्टय राहिले. आर्थिक स्वावलंबन, कायदेशीर हक्क, राजकारणातील सहभागासाठी स्त्री संघटित करण्यावर लक्ष केद्रित केले गेले. १९२१ चा स्त्री मतदानविषयक कायदा हे स्त्री संघटितपणाचे फलित ठरले. २० व्या शतकातील स्त्री वर्गात आलेल्या आत्मभानाचे वर्णन करतांना डॉ. स्वाती कर्वे म्हणतात, एकंदरीत स्त्री जीवनाच्या विकासाचे एकुण चार टप्पे राहिले. या चार टप्प्यांमधून स्त्रियांचा मानसिक विकास एका दिशेने घडला. प्रथम शिक्षणाची इच्छा निर्माण झाली. पुनर्विवाहाची जाणीव निर्माण झाली. रूढीविषयी तक्रार निर्माण होऊन सहकार्याची अपेक्षा जागी झाली, सामाजिक कार्याविषयीची जबाबदारी समजली. स्त्रियांमध्ये आपापसांत सुध्दा नवीन प्रगल्भ नाते, सामंजस्य निर्माण झाले. स्त्रियांविषयी होणारे कायदे समजून त्याविषयी स्त्रिया अधिक जागरूक झाल्या. शिक्षणाने प्रगल्भता येऊन स्त्रिया राजकीय क्षेत्राकडे वळल्या. सामाजिक विषयांवर स्वत:ची मते व्यक्त करू लागल्या. अन्यायाविरूध्द आवाज उठवण्यास त्यांनी सुरूवात केली. सामाजिक रूढींविरूध्द केवळ विरोध न करता कृतिशील नविन प्रथा सुरू केल्या. स्त्रियांच्या संघटना उभ्या राहून संघटित प्रयत्न केले. परिषदांतून स्त्रियांनी अधिकारांची सातत्याने मागणी केली. कालखंडाअखेरीस विविध क्षेत्रात सन्माननीय प्रवेश करून स्त्रियांचे अस्तित्व अर्थपुर्ण बनवले.

स्त्री प्रश्नासंबंधाने सुरू झालेल्या धर्मसुधारणांचा महाराष्ट्राच्या स्त्री जीवनावर संमिश्रीत स्वरूपाचा प्रभाव पडला. वासाहतिक कालखंडात शिक्षण घेणा—या स्त्री वर्गाची आत्मजाणीव विकसित होत गेली. हा शिक्षित वर्ग स्वप्रयत्नाने, संघटितपणे स्त्री प्रश्नांची सोडवणूक करण्यासंबंधाने विविध पर्यायांचा अवलंब करू लागला. राजकारणात, अर्थकारणात, वाड:मय क्षेत्रात स्वत:चे वेगळे विश्व निर्माण करू लागला. स्त्री अधिकारांप्रती कायदेशीर संरक्षण कवचाची आग्रही मागणी करू लागला. त्याचवेळी या कालखंडातील दुसरा अशिक्षित ग्रामीण स्त्री वर्ग मात्र हया सगळया बदलांकडे केवळ तटस्थपणे बघत उभा राहिला. शिक्षित स्त्री वर्गाव्दारे लढल्या जाणा—या लढाईकडे विस्मितपणे बघत होता पण हया संघर्षात उतरण्याचे धारिष्टय ग्रामीण स्त्री मध्ये आले नव्हते. याची कारणे डॉ. मिनल जगताप यांनी अधोरेखित केली. एकंदरित वासाहतिक व स्वातंत्रोत्तर कालखंडातील स्त्री जीवनाचे दृश्य बदलत गेले हे जरी खरी असले तरी त्यापासून अजूनही मोठा स्त्री वर्ग (ब्राम्हणेत्तर) दूरच होता. आणि ही परिस्थिती आजही महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात स्पष्टपणे जाणवते.

**संदर्भ**

१. वडगबाळकर श्रृती, **मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास**, पृ. १२५
२. उपरोक्त, पृ.१५५
३. जगताप राम, धसकटे सुनील, २०१२ **मराठा समाजः वास्तव आणि अपेक्षा**, राजहंस प्रकाशन, पुणे पृ. ३८

४. डॉ. कर्वे स्वाती,(२००८), **स्त्रियांची शतपत्रे (१८५०–१९५०)**, प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ. १३२,
५. उपरोक्त, पृ.१८९
६. डॉ. जगताप मीनल (२०१०) , **मराठा स्त्रियांचे स्थान**, सुमन प्रकाशन, पुणे, पृ. ११२–१२२
७. उपरोक्त, पृ.१२५
८. सामंत, मगंला (२०००), **स्त्री पर्व**, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. ११८
९. उपरोक्त, पृ.१२०,१२१
१०. ढेरे अरूणा (२००१), **विस्मृतिचित्रे**, श्रीविदया प्रकाशन, पुणे, पृ. १३
११. वैदय सरोजिनी, (१९९१), **श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र (१८६१–१९४८),** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पृ. १७७
१२. रानडे, रमाबाई (१९५८), **आमच्या आयुष्यातील काही आठवणी,** आर्यभुषण मुद्रणालय, पुणे., परिशिष्ट पृ. १८
१३. आपटे भा. प. (नोव्हे. २००३) **कर्मयोगी जानकीबाई आपटे** श्रीविदया प्रकाशन, पुणे, पृ. ७२
१४. उपरोक्त, पृ.७३
१५. जगताप राम, धसकटे सुनील, टिप क्र. ३, पृ. ३९
१६. उपरोक्त, पृ.७३
१७. डॉ. जगताप मिनल, टिप क्र. ६, पृ. १०८
१८. उपरोक्त, पृ.११०,१११
१९. उपरोक्त, पृ.१०७
२०. ढेरे अरूणा, टिप क्र.१०, पृ. ४६,४७
२१. डॉ. कर्वे स्वाती, टिप क्र. ४, पृ. १३३,१३४
२२. उपरोक्त पृ. १५३,१५४
२३. उपरोक्त, पृ.१५५
२४. उपरोक्त, पृ.१९५,१९६
२५. आपटे भा.प. टिप क्र. १३, पृ. ०९
२६. उपरोक्त, पृ.१०
२७. उपरोक्त, पृ.३६
२८. उपरोक्त, पृ.३२
२९. उपरोक्त, पृ.३८
३०. डॉ. जगताप मिनल, टिप क्र. ६, पृ. १४७
३१. उपरोक्त, पृ.१५३,१५४
३२. वैदय सरोजिनी, टिप क्र. ११, पृ. १६४
३३. रानडे रमाबाई टिप क्र. १२, परिशिष्ट पृ. १९
३४. डॉ. पवार वैशाली (२०१२) ,**महिलांच्या सत्तासंघर्षाच्या आलेख**, डायमंड पब्लीकेशन, पुणे पृ. ११
३५. डॉ. कर्वे स्वाती, टिप क्र. ४,पृ. १९४
३६. वडगबाळकर श्रुती, टिप क्र. १, पृ. १६७
३७. डॉ. कर्वे स्वाती, टिप क्र.४, पृ. १८९
३८. आपटे भा.प. टिप क्र. १३, पृ. ३८
३९. डॉ. जगताप मिनल, टिप क्र. ६, पृ. १८१,१८२
४०. उपरोक्त, पृ.१८८–१९०
४१. डॉ. कर्वे स्वाती, टिप क्र.४, पृ. १२८,१२९
४२. डॉ. जगताप मिनल, टिप क्र. ६, पृ. १९३,–१९५

४३. भोळे, भा.ल., बेडकिहाळ किशोर (२००६), **शतकांतराच्या वळणावर** आंबेडकर अकादमी, सातारा, पृ. ५४—५८
४४. आपटे भा.प. टिप क्र. १३, पृ. २०
४५. डॉ.पवार वेशाली, टिप क्र.३४, पृ. २६,३२
४६. उपरोक्त, पृ.३७
४७. उपरोक्त, पृ.९५
४८. उपरोक्त, पृ.३७
४९. उपरोक्त पृ. ३८
५०. डॉ. जगताप मिनल, टिप क्र. ६, पृ. २०८